सांकेतांक क्र. 201002101305584-001

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी
आर्थिक सहाय्याची योजना.....

महाराष्ट्र शासन,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-युटीए-1099/प्र.क्र.45/मावक-2,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032. दिनांक:- 30 जानेवारी, 1999.

शासन निर्णय :- अस्पृश्यता निवारणाच्या योजनेचा एक भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना शासनातर्फे 1958 सालापासून राबविण्यात येते.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास शासन परिशिष्ट-"अ" मध्ये नमूद केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन यासंदर्भात खालीलप्रमाणे निदेश ह्या शासन निर्णयाद्वारे देत आहे.

मार्गदर्शक तत्वे/सूचना.

1. आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या व्यक्तीपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदू, लिंगायत यांच्यातील असेल तर अशा आंतरजातीय विवाहितांस ही योजना लागू आहे.

2. ही योजना अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यापैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदू, जैन, लिंगायत, बौध्द, शीख या धर्मातील असेल तर त्या विवाहास आंतरजातीय विवाह म्हणून संबोधण्यात येत होते. तसेच आता अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतर केलेल्यांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळावा या हेतूने केंद्र शासनाने घटना (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा 1990, दिनांक 3 जून, 1990 अन्वये घटना (अनुसूचित जाती) आदेश 1950 मध्ये सुधारणा करुन, अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश बौध्द धर्मियांना लागू करण्यात आल्याचे घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अनुसूचित जातीची यादी हिंदू अथवा शीख अथवा बौध्द धर्मियांनाही लागू झालेली आहे. त्यानुसार बौध्द धर्मात धर्मांतर केलेल्या अनुसूचित जातीच्या व्यक्ती (आंतरजातीय विवाहाची जोडपी) या योजनेखालील सवलती मिळण्यास आपोआप पात्र आहेत.

3. दिनांक 1 एप्रिल, 1995 या आर्थिक वर्षापासून शासनाने आंतरजातीय विवाहितांना देण्यात येणा-या आर्थिक सहाय्यात वाढ केलेली असून आता रु.15,000/- इतके आर्थिक सहाय्य देण्यात येत असून रु.15,000/- पैकी अर्धी रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त नावाने अल्पबचतीत गुंतविण्यात यावी असेही आदेश शासन देत आहे.

4. शासनाने अर्थसहाय्यात वाढ केल्यानंतर ज्या आंतरजातीय विवाहितांनी यापूर्वीच या योजनेचा लाभ घेतलेला होता अशा आंतरजातीय विवाहितांना हे वाढीव अर्थसहाय्य देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. परंतु ब-याच प्रकरणात शासनाच्या असे निदर्शनास आले की, अशाप्रकारे आंतरजातीय विवाह हा ब-याच वर्षापूर्वी झालेला आहे परंतु त्या जोडप्याने त्यावेळेस अर्थसहाय्य घेतलेले नव्हते, अशा प्रकरणी त्यांना अर्थसहाय्य द्यावे किंवा कसे, व जर अर्थसहाय्य द्यावे तर कोणत्या दराने द्यावे हा प्रश्न निर्माण झाला होता. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, सदर अर्थसहाय्य देण्याबाबत ज्यावेळी अर्जदार अर्थसहाय्यासाठी अर्ज करतो ती तारीख अर्थसहाय्यासाठी ग्राह्य धरावी व त्याप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करावे. विवाह केव्हा झाला ती तारीख आंतरजातीय विवाहितांना अर्थसहाय्य देण्यासाठी ग्राह्य धरु नये.

5. अ) सर्व संबंधित नव विवाहित आंतरजातीय विवाहितांना सन 1995-96 या वर्षात ज्यांना जुन्या दराने अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे त्यांना फरकाची रक्कम अदा करण्यात यावी.

ब) रु.15,000/- या अर्थसहाय्याची विभागणी रु.7,500/- ठेवीच्या स्वरुपात पती-पत्नीच्या संयुक्त नावाने अल्पबचतीत, रु.7,000/- रोख रकमेने, रु.400/- संसारपयोगी साहित्य खरेदी करण्यासाठी, व रु.100/- स्वागत समारंभासाठी करण्यात यावी.

6. ही योजना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यांचेमार्फत राबविण्यात यावी.

7. समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यांचेकडे या अर्थसहाय्याकरिता [illegible] अर्ज ठेवलेला आहे. सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यांना असे कळविण्यात येते की, या [illegible] आर्थिक वर्षात [illegible]

होणारे अर्ज त्या-त्या आर्थिक वर्षात निकाली काढणे आवश्यक राहील. याकरिता सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज हे वर्षातून दोन वेळा निकाली काढणे आवश्यक राहील. माहे सप्टेंबर व माहे मार्च या दोन महिन्यांत प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सहा महिन्यांत प्राप्त झालेले अर्ज निकाली काढण्यात यावेत. याकरिता, एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात समारंभपूर्वक निकाली काढावेत व ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज मार्च महिन्यात 8 मार्च या "महिला दिनी" समारंभपूर्वक निकाली काढावेत.

8. सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा, हे प्राप्त झालेल्या अर्जाची, अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून 30 दिवसांत योग्य ती छाननी करतील. समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा, यांचेमार्फत ही योजना राबवीत असताना स्वीकारण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत परिशिष्ट "ब" येथे जोडलेला आहे. या अर्जातील सर्व बाबी पूर्ण असल्याशिवाय समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा, यांनी अर्जाचा स्वीकार करु नये. अर्जामध्ये काही त्रुटी आढळून आल्या, काही कागदपत्रे कमी असल्याचे आढळून आले तर, संबंधित अर्जदाराला तात्काळ त्याठिकाणी तसे सांगण्यात यावे. एकदा जर अर्जदाराकडून अर्ज प्राप्त करुन घेतला तर याचा अर्थ अर्जदारांनी दिलेली सर्व माहिती बरोबर आहे व संबंधित अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी ही माहिती पाहून व कागदपत्रांची पाहणी करुन हा अर्ज स्वीकारलेला आहे असे समजण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराला कागदपत्रांच्या अभावी किंवा अर्जात त्रुटी आहेत म्हणून अर्ज परत करण्याचा किंवा त्याचा अर्ज निकाली काढण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

9. संचालक, समाजकल्याण हे जिल्हानिहाय या योजनेंतर्गत तरतुदींचे वाटप करुन देतील. या अर्जास अंतिम मान्यता देण्याचे काम समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा, यांचे स्तरावरच केले जाईल. कोणत्याही परिस्थितीत अशाप्रकारे मान्यता देण्यासाठी हे प्रकरण जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचे स्तरावर पाठविण्यात येऊ नये.

10. कोणत्याही लाभार्थ्याने या योजनेचा दोन वेळा लाभ घेऊ नये यासाठी लाभार्थ्यांनी सादर केलेल्या (अ) विवाह नोंदणी दाखला, (ब) वर/वधू यांचा शाळा सोडल्याचा दाखला व, (क) वर/वधू यांच्या जातीच्या दाखल्यावर मूळ प्रतीच्या मागील बाजूस "आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आलेले आहे" असा रबरी शिक्का मारण्यात यावा.

11. सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी त्यांचे कार्यालयात परिशिष्ट "ड" येथे नमूद केल्याप्रमाणे नोंदवही नमुन्यात माहिती ठेवावी.

12. माहे सप्टेंबर व माहे मार्च या दोन महिन्यांत दोन वेळेस शेवटच्या आठवड्यात समारंभ पूर्ण झाल्यानंतर माहे ऑक्टोबर व माहे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सोबतच्या परिशिष्ट "क" येथे नमूद केलेली माहिती संचालक, समाजकल्याण यांचेकडे पाठवावी. संचालक, समाजकल्याण यांनी सर्व जिल्ह्यांची माहिती संकलित करावी.

13. यावरील होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-7, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, 800-इतर खर्च (3) जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (सी) केंद्र पुरस्कृत योजना, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 187 अन्वये जिल्हा परिषदांना केंद्रीय अनुदाने (2225-2462) 41-सहाय्यक अनुदाने" या लेखाशीर्षाखाली टाकण्यात येऊन हा खर्च यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. का. पाईकराव),
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव (पत्राने),
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

आंतरजातीय विवाहितांना देण्यात येणारे अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :आंजावि - २००७/प्र.क्र.१९१/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १ फेब्रुवारी, २०१०.

वाचा: १. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.युटीए १०९९/प्र.क्र.४५/मावक-२, दिनांक : ३० जानेवारी, १९९९.

२. शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.आंजावि-२००३/प्र.क्र.५०१/मावक-२, दिनांक ६ ऑगस्ट,२००४

प्रस्तावना: अस्पृश्यता निवारण्याचा योजनांचा एक भाग म्हणुन आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना शासनातर्फे १९५८ सालापासून राबविण्यात येत आहे. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, १९९९ अन्वये आर्थिक सहाय्यामध्ये वाढ करुन ती रु.१५,०००/- करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ही योजना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व्यक्तींपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सुवर्ण, हिंदू, लिंगायत,जैन,शिख यांच्यातील असेल तर अशा आंतरजातीय विवाहीतांस लागू करण्यात आलेली आहे. अनु.क्र.२ नुसार सदर योजना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यामधील आंतर प्रवर्गातील आंतरजातीय विवाहितांसाठी आंतरजातीय विवाहाच्या सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. आंतरजातीय विवाहासाठी इतर राज्यांमध्ये उदा.गुजरात, हरियाणा, मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तरप्रदेश आणि चंदीगड इ. राज्यांमध्ये रु.५०,०००/- पर्यन्त अनुदान देण्यात येते. त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्यास देण्यात येणा-या आर्थिक मर्यादेमध्ये वाढ करण्याची, तसेच ही योजना मागास प्रवर्गासही लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय : आंतरजातीय विवाहाची योजना मागास प्रवर्गातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यामधील आंतर प्रवर्गातील आंतर जातीय विवाहीतांना शासन निर्णय दिनांक ३०/१/१९९९ मध्ये नमूद केलेल्या सवलती देण्यात येत आहेत. यामध्ये वाढ करुन आंतरजातीय विवाह करणारे सवर्ण व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांना देण्यात येणा-या अर्थसहाय्यामध्ये रु.१५,०००/- वरुन रु.५०,०००/- इतकी वाढ देण्यात येत आहे.

२. सदरहू योजनेबाबतच्या इतर अटी व शर्ती शासन निर्णय, दिनांक : ३० जानेवारी, १९९९, व शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट,२००४ प्रमाणेच राहतील.

* सदरहू योजनेसाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये ... विहित अर्थसंकल्पात उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

समाज कल्याण विभाग
पत्र क्र. :
23 MAR 2010

[कृ.मा.प.